महानगरपालिका सर्वसाधारण सभा

दिनांक 20/04/2017

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( सचिवालय )

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 44 अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमुद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रश्न क्रमांक</th><th>मा. सदस्यांचे नांव</th><th>प्रश्नाचे उत्तर</th></tr>
<tr><td>1.</td><td>1.</td><td>मा. श्री. दुनेश्वर पेठे, नगरसेवक</td><td>
<table>
<tr><th>अनु क्र.</th><th>प्रश्न</th><th>उत्तर</th></tr>
<tr><td>1</td><td>पुर्व नागपूर मे 24X7 पाणी की योजना कोण कोनसे एरीयामे पानी दिया जा रहा है और कोण कोनसे एरीया मे 24X7 योजनाका पानी नही मिल रहा है, सविस्तर जानकारी देवे.</td><td>पुर्व नागपूरमध्ये खालील जलकुंभावरून त्यांचे समोर दर्शविलेल्या वस्त्यांना 24X7 योजनेअंतर्गत पाणीपुरवठा करण्यात येतो.<br>1. नंदनवन (जुना अस्तित्वात असलेला जलकुंभ)<br>किर्तीनगर, प्रशांतनगर, नंदनवन लेआउटचा काही भाग,<br>नविन नंदनवन लेआऊट,<br>कवेलु क्वार्टर, एम.आय.जी. कॉलनी,<br>नंदनवन हाउसिंग बोर्ड कॉलनी,<br>व्यंकटेशनगर, नंदनवन घरकुल.<br>2. भरतवाडी (देशपांडे लेआउट, जुना अस्तित्वात असलेला जलकुंभ)<br>देशपांडे लेआऊट, हिवरी कोटा, त्रिमुर्तीनगर, देशपांडे लेआउट, आदर्शनगर स्लम, प्रजापतीनगर, नेहरूनगर स्लम, संघर्षनगर, वाठोडा जुनी वस्ती.<br>3. कळमना जलकुंभ<br>डिप्टी सिग्नल, साखरकर वाडी, वैरागडे वाडी, कुंजरामा वाडी, सनयाज नगर, रेल्वे कॉलनी,<br>चिखली लेआउट, चिखली झोपडपट्टी, राहूल गांधी नगर, कळमना मार्केट, चिखली गांव,<br>आराम वाडी नगर, चिखली लेआउट नागपूर<br>उपरोक्त वस्त्याव्यतिरीक्त पूर्व नागपूर मधिल इतर वस्त्यांनमध्ये 24X7 योजना अध्याप पूर्ण झालेली नाही.</td></tr>
<tr><td>2</td><td>भांडेवाडी डंपिंग यार्डमे साडे आठ एकड जमीनमे खेल मैदान और गार्डन बनानेवाले थे। उसका क्या हुआ सविस्तार जानकारी देवे उपरोक्त एकूण प्रश्न पालिकामे समाविष्ट करे.</td><td>भांडेवाडी डंपींग यार्डमध्ये उद्यान तयार करण्याचा प्रस्ताव नाही. परंतू वाठोडा येथील खेळाचे मैदानाकरिता आरक्षित जागेबाबतचा प्रकल्प अहवाल खालीलप्रमाणे आहे.<br>सदर्हु जागा मौजा वाठोडा खसरा क्र. 27 (1) ते 40 (1) नगर भुमापन क्र. 39 मधील असुन ही जागा खेळाचे मैदानाकरिता आरक्षित आहे व आरक्षण क्र. ME.58 आहे. या जागेवर बी.ओ.टी. तत्वावर इनडोअर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स किंवा Sports Facility Centre तयार करण्याचा प्रस्ताव प्रकल्प विभागातर्फे नगररचना विभागास दि. 13.11.2014 ला मंजूरीस्तव पाठविण्यात आला असता नगररचना विभागाने या प्रस्तावावर छाननी करुन शासन अधिसूचना दि. 02.05.2016 प्रमाणे आरक्षित जागेचा वापर खेळाचे मैदान याच वापराकरिता करता येईल व एखाद्या कोपऱ्यात Indoor Games, Public Toilet, Changing Room, Gymnasium, Canteen इत्यादी बांधकाम एकूण जागेच्या 15 % पर्यंत अनुज्ञेय असलयाचे कळविले आहे. 15 % क्षेत्रापैकी जास्तीत जास्त 10 % पर्यंत क्षेत्र तळमजल्यावर वापरता येईल असे कळवले आहे व अशा प्रकल्पाचा नकाशा मंजूर करणे शक्य नसल्याने नस्ती परत केली आहे. नगररचना विभागाने कळविल्याप्रमाणे 15 % पर्यंत बांधकामाच्या आधारावर या जागेवर उद्योजकामार्फत कुठलाही विकास प्रकल्प राबविणे उत्पन्न व्यवहार्य होणार नाही असे अंतीम निर्णय विभागामध्ये झाल्याने आता या जागेवर यासंदर्भात प्रकल्प विभागामार्फत पुढील कार्यवाही प्रस्तावित नाही.</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

हस्ता/- निगम आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

महानगरपालिका सर्वसाधारण सभा

दिनांक 20/04/2017

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( सचिवालय )

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 44 अंतर्गंत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमुद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | मा. सदस्यांचे नांव | प्रश्नाचे उत्तर | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अनु क्र. | प्रश्न | उत्तर |
| 2. | 2. | ॲड.श्री. धर्मपाल मेश्राम | 1 | दि. 2 मार्च 2017 ला स्वामीनारायण मंदीर वाठोडा रिंग रोड येथील पुल व रोडचे रूंदीकरण करणारी आरपीएस इन्फ्रा कंपनीने महानगरपालिकेच्या 150, 200 व 300 मि.मि. व्यासाच्या पिण्याच्या पाईप लाईन तोडल्या हे खरे आहे काय? | होय, खरे आहे. |
| | | | 2 | हयामध्ये जवळपास 16 लक्ष रूपयाचे महानगरपालिकेचे नुकसान झाले व दि. 2 मार्च ते 8 मार्च हया सहा दिवसांत सुमारे अंदाजे 600 पिण्याच्या पाण्याच्या टँकरद्वारे फेऱ्या करण्यात आल्या, त्यातही महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले, हे खरे आहे काय? | दि. 05.03.2017 ला, फुटलेली 200 मि.मि. व्यासाची पाईप लाईन कंत्राटदाराकडून पूर्ववत करून घेण्यात आली व त्याद्वारे पूर्वीप्रमाणे पाणीपुरवठा सुरू झालेला आहे. दि. 03.03.2017 ते 05.03.2017 दरम्यान एकूण 77 टँकर ट्रिप महानगरपालिकेतर्फे पाठविण्यात आल्यात. त्याचा अंदाजीत खर्च रू. 29000/- त्यांचे कडून वसूल करण्याचे प्रस्तावित आहे. उर्वरित 150 व 300 मि.मि. व्यासांच्या सध्या बंद असलेल्या जलवाहीनीचे काम कराय<br>चे आहे. हे काम कंत्राटदारामार्फत केल्यास म.न.पा.चे नुकसान होणार नाही. |
| | | | 3 | असल्यास महानगरपालिका प्रशासनाने काय कारवाई केली? | दि. 03.03.2017 ते 05.03.2017 या काळात तक्रार ग्रस्त भागात आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपूरवठा करण्यात आला. दि. 02.03.2017 रोजी वरिष्ठ पोलीस निरिक्षक नंदनवन पोलीस स्टेशन ला पत्राद्वारे तक्रार केली आहे, व आर.पी.एस. इन्फ्रा कंपनी, कळमना मार्केट यांना पत्र क्र. ज.प्र. /175/झो. 8, दि. 09.03.2017 अन्वये लेखी कळविले आहे. |
| | | | 4 | एफ.आर.आर.दाखल केले त्याचे पुढे काही झाले काय? | संबंधितांना ओ.सी.डब्ल्यु.द्वारे प्रत्यक्ष विचारणा केली असता चौकशी चालु आहे असे कळविले. |
| | | | 5 | प्रशासनाने आर.पी.एस. कंपनीवर दंडात्मक कार्यवाही केली काय? | कंत्राटदाराने काम करून दिल्यास दंडात्मक कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. अन्यथा या कामाला लागणारा खर्च कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल व तसे न झाल्यास त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करता येईल. |

हस्ता/— निगम आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

महानगरपालिका सर्वसाधारण सभा

दिनांक 20/04/2017

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

## ( सचिवालय )

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 44 अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमुद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | मा. सदस्यांचे नांव | अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|---|---|
| 3. | 3. | श्री. संजय मधुकरराव महाकाळकर | 1 | नागपूर शहरात मनपा व्दारे विविध ठिकाणी सिमेंट रोडचे बांधकाम सुरू आहे. परंतु बरेच रस्ते अर्धवट झालेले आहे व काही रस्त्याचे काम बंद असलयाचे दिसून येते. त्यामुळे नागरीकांना रहदारीस त्रास होत आहे. तसेच रस्त्यावरील धुळीमुळे आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. तरी सदर रस्त्याचे बांधकाम पुर्ण होण्याची कालमर्यादा काय आहे व त्या संबंधी अधिकाऱ्यांची याबाबत काय जबाबदारी आहे याचे स्पष्टीकरण दयावे. | • तुकडोजी महाराज सिमेंट कॉक्रीट रस्ता टप्पा 1 अंतर्गत एकूण 30 रस्त्याच्या समावेश असून त्याची लांबी 25.775 कि.मी. इतकी आहे. यापैकी एकूण 12 रस्त्याचे काम पूर्ण झाले असून त्यांची एकूण लांबी 10.273 कि.मी. आहे. सद्यस्थितीत 4 रस्त्यावर काम प्रगतीत असून या रस्त्याची एकूण लांबी 5.655 कि.मी. इतकी आहे.<br>• सद्यस्थितीत 4 रस्त्यावर काम सुरू असून एका बाजूस कॉक्रीट रस्त्याचे काम करण्यात येते आहे. उर्वरित दुसऱ्या बाजूचा रस्ता वाहतुकीसाठी मोकळा सोडण्यात आलेले आहे. रस्त्याची एक बाजूचे पूर्णपणे काम झाल्यानंतरच वाहतुकीकरिता सुरू करण्यात येतो. रस्त्याचे काम सुरू असतांनी रस्त्यावरिल धुळ उडणार नाही यांची पूर्णपणे खबरदारी घेण्यात येते. या प्रकल्पात सुरू असलेल्या कामामध्ये कुठलेही काम अर्धवट सोडण्यात आलेले नाही.<br>• या प्रकल्पाच्या कामाचा कालावधी कार्यदेश दिनांकापासून 24 महिने (पावसाळा वगळून) असून उर्वरित कामे दिनांक 26.01.2018 पर्यन्त पूर्ण करावयाचे नियोजन आहे.<br><br>नागपूर महानगरपालिकेव्दारे सिमेंट कॉंक्रीट रस्ते प्रकल्प टप्पा–2 अंतर्गत एकुण 22 पॅकेज निहाय 59 रस्त्यांचे कॉंक्रीट व्दारा बांधकाम प्रस्तावित आहे. त्यापैकी एकुण 20 पॅकेज करीता वेगवेगळया कार्यादेश निर्गमीत असुन त्याचा कालावधी 11 महीने आहे. एकुण 33 रस्त्याची कामे प्रगतीपथावर आहे. कामास उशीर होण्याकरीता साधारणतः कारणे खालील प्रमाणे आहेत.<br>1. एका पॅकेज मध्ये साधारणतः 2 किंवा 3 रस्त्याचा समावेश असून वाहतुक पोलीसा व्दारे एका रस्त्याचे काम पुर्ण केल्यानंतरच इतर रस्त्याकरीता वाहतुक वळविण्याची परवानगी देण्यात येते.<br>2. काही रस्त्यावरील भुमीगत सुविधा स्थानांतरीत करण्या करीता लागणारा कालावधी.<br>3. सध्या तापमान 42 डिग्री चे वर असल्याने कॉंक्रीट चे काम थांबविण्यात आलेले असुन फक्त अर्धवट कामामुळे वाहतुकीस अडचण निर्माण होत आहे. त्याठीकाणी सुरळीत वाहतुक होईल अश्याप्रकारे रस्ता बांधकामाबाबत उपाययोजना करण्याबाबत सर्व कार्यकारी अभियंता/यंत्रणेला लेखी कळविण्यात आलेले आहे.<br>ज्या पॅकेज चा कामाचा कालावधी पुर्ण झालेला आहे. त्यांना दंडात्मक कार्यवाही करून मुदतवाढ देण्याची प्रक्रिया सुरू आहे.<br>त्याचप्रमाणे पुर्ण केलेल्या रस्त्याची सफाई करून रस्ता वाहतुकीस मोकळा राहील याबाबत सुध्दा खबरदारी घेण्यात येत आहे. (पॅकेज निहाय व रस्ता निहाय कामाचा अहवाल सोबत संलग्न आहे.) |

निगम आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

महानगरपालिका सर्वसाधारण सभा

दिनांक 20 / 04 / 2017

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( सचिवालय )

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 44 अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमुद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | मा. सदस्यांचे नांव | प्रश्नाचे उत्तर | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अनु क्र. | प्रश्न | उत्तर |
| 4. | 4. | श्री. संजय मधुकरराव महाकाळकर | 1 | नेहरूनगर झोन क्र. 5 मधील माझे प्रभाग क्र. 30 मध्ये नळाला मुबलम पाणी येत नसल्याच्या तक्रारी आहे. तसेच वंजारीनगर पाण्याचे टाकीवरून टँकरद्वारा नियमित पाणीपुरवठा होत नसल्यामुळे प्रभागातील बऱ्याच वस्त्यामध्ये पाण्याची भिषण टंचाई निर्माण झालेली आहे. नागपूर शहरामध्ये सर्वत्र हीच परिस्थिती आहे. तरी याबाबत जबाबदार कोण व यावर काय उपाययोजना करण्यात येणार आहे याबाबत स्पष्टीकरण द्यावे. | उपरोक्त संदर्भांकित विषयांच्या अनुषंगाने प्रभाग क्र. 30 बाबतची पाणीपुरवठा संदर्भात सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.<br>प्रभाग क्र. 30 अंतर्गत समाविष्ठ वस्त्या व पाणीपुरवठयाच्या वेळा खालालप्रमाणे आहेत.<br>अ. तोहीबनगर, न्यु सुभेदार, सुदर्शन नगर, रूक्मीनीनगर, श्रीराम नगर, गुरूदेवनगर, ठवरे कॉलनी, नासीकनगर, राजीव गांधी नगर, संजय नगर, आशिर्वादनगरचा काही भाग या सर्व वस्त्यांमध्ये रोज 40 ते 45 मिनिट पाणीपुरवठा होत आहे.<br>ब. सेवादल नगर, भांडेप्लॉट झोपडपट्टी, गावंडीपूरा, सोनझारी नगर, सरताज कॉलनी, यासीन प्लॉट, आझाद कॉलनी, शिवांगी सोसायटी, ठाकूर प्लाट, संतोषीमाता नगर, न्यू बिडीपेठ, आशिर्वाद नगरचा काही भाग (30 ते 35 मिनिट वेळ पाणीपुरवठा सर्व वस्त्या)<br>क. राणी भोसले नगर, प्रेम नगर, इंदीरा गांधी सभागृहामागील काही भाग (20 ते 25 मिनिट वेळ पाणीपुरवठा सर्व वस्त्या)<br>या प्रभागाची अंदाजे लोकसंख्या 65000 ईतकी आहे. या प्रभागातील वस्त्यांमध्ये महानगरपालिकेचे अधिकृत उपभोक्त्यांची संख्या अंदाजे 6700 ईतकी आहे.<br>वरील लोकसंख्याच्या आधारे 12 एम.एल.डी. ईतक्या पाण्याची आवश्यकता आहे.<br>या प्रभागामध्ये सध्याच्या परिस्थितीत सक्करदरा 1, 2, 3, ताजबाग व म्हाळगीनगर या पाण्याच्या टाक्याद्वारे या परिसरात पाण्याचा पुरवठा होत असून 8.7 एम.एल.डी. ईतका पाणीपुरवठा होत आहे. शहरात 24X7 योजना सुरू झाल्यावर हा फरक राहणार नाही.<br>येथे सध्याच्या परिस्थितीत 3.3 एम.एल.डी. पाणी कमी पडत आहे.<br>सर्व मा. नगरसेवकांद्वारे येत असलेल्या टँकर ट्रिप्सची सध्याची मागणी ही अंदाजे 120 ट्रिप्स आहे व सध्याच्या परिस्थितीत होत असलेल्या टँकर ट्रिप्सची संख्या ही अंदाजे 80 ट्रिप्स आहे. टँकर ट्रिप्स वाढविण्यात येत आहेत.<br>प्रभाग क्र. 30 मध्ये सक्करदरा 1, 2, 3 व ताजबाग या पाण्याच्या टाक्या कन्हान फिडरवर शेवटच्या टोकावर असल्यामुळे कन्हानमध्ये काही ब्रेक डाऊन झाल्यास टाकीला प्राप्त होणाऱ्या लेवल पुर्णतः मिळत नाही व मधेमध्ये अशा घटना होत असल्यामुळे प्रभागात पाण्याची टंचाई निर्माण होत आहे.<br>3.3 एम.एल.डी. कमी पाण्याची पूर्णता करण्याकरीता व सर्व टाक्यांना वाढीव आवश्यक पाणी प्राप्त करण्याकरीता ओ.सी.डब्ल्यु.प्रयत्नरत आहे. या प्रभागात टँकर वंजारीनगर टाकीवरून पुरवण्यात येत असून मा. नगरसेवकांच्या मागणीप्रमाणे एकुण 80 ट्रिप्स पुरवल्या जातात. परंतु नगरसेवकांची मागणी पूर्ण होत नसल्यामुळे टँकरची संख्या वाढविण्याबाबत ओ.सी.डब्ल्यु प्रयत्नरत आहे.<br>शहरात व प्रभाग क्र. 30 मधील पाणी टंचाई व नेटवर्क भागातील टँकर बाबतचे सद्यपरिस्थितीत नियोजन ओ.सी.डब्ल्यु.मार्फत होत असून ही जबाबदारी पार पाडण्यास एन.इ.एस.एल.चे निर्देशानुसार ओ.सी.डब्ल्यु. यांना निर्देशित केले आहे.<br>नागपूर शहरात ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या निर्माण झालेल्या परिस्थितीवर उपाययोजना करण्याकरिता मा. महापौर यांनी झोननिहाय सर्व दहाही झोनच्या मा. सदस्यांसमवेत सभा घेऊन प्रत्येकाची अडचण जाणून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यास प्रशासनाला निर्देश दिलेले आहेत.<br>मा. पालकमंत्री महोदयांनी शहराच्या पाणीपुरवठयासंबंधी सभा घेऊन उन्हाळयात होणारा पाणीपुरवठा व्यवस्थित ठेवण्याचे अनुषंगाने मा. आयुक्त यांना मा. आमदारासोबत विधानसभा क्षेत्रनिहाय सर्व मा. वार्ड सदस्यांना घेऊन सभा घेण्यात याव्या व त्यांचे अडचणींवर त्वरीत उपायेजना करून समस्यांचे निराकरण करावे असे निर्देश दिलेले असून मा. आयुक्त यांनी त्यानुसार अनुपालन करणे सुरू केलेले आहे. |

हस्ता / – निगम आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

महानगरपालिका सर्वसाधारण सभा

दिनांक 20/04/2017

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( सचिवालय )

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 44 अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमुद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रश्न क्रमांक</th><th>मा. सदस्यांचे नांव</th><th>प्रश्नाचे उत्तर</th></tr>
<tr><td>5.</td><td>5.</td><td>श्री. प्रफुल्ल विनोदराव गुडधे</td><td>
<table>
<tr><th>अ.क्र</th><th>प्रश्न</th><th>उत्तर</th></tr>
<tr><td>०१</td><td>दि. २९/०३/२०१७ रोजी शहरबस वाहतुक सेवा पुर्णत: बंद होती, त्यामुळे नागरिकांचे हाल झाले व मनपाचे आर्थिक नुकसान झाले असून किती नुकसान झाले ?</td><td>दि. २९/०३/२०१७ रोजी चे सकाळपासुन शहरबस वाहतुकीतील कार्यरत चालक व वाहक या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांनी संगनमत करून अचानक शहरबस वाहतुक पुर्णपणे बंद पाडली. यामुळे प्रवाशी वर्गाची मोठया प्रमाणात गैरसोय झाली. तसेच यामुळे मनपास अंदाजे १२ ते १३ लाख रूपयाचे उत्पन्न प्राप्त होवू शकले नाही.</td></tr>
<tr><td>०२</td><td>झालेल्या आर्थिक नुकसानाची जबाबदारी निश्चित केली का ? व कुणावर केली ?</td><td>सदरर्हु कर्मचाऱ्यांमार्फत अचानक संप केल्यामुळे तसेच या बेकायदेशिर संपात संगनमत करून संप करण्याची ही कृती व नियमबाहय केलेला संप बेकायदेशिर घोषीत करण्याची विनंती देखिल मा. अपर कामगार आयुक्त यांचे कार्यालयास परिवहन विभागाचे पत्र क्र. परिवहन/९१८/२०१७, दि. ३०/०३/२०१७ अन्वये करण्यात आलेली आहे. तसेच या कर्मचाऱ्यां मार्फत अचानकपणे केलेल्या संपामुळे अत्यावश्यक असलेली बस वाहतुक बंद करण्यासाठी जबाबदार असलेले संघटनांचे पदाधिकारी व कर्मचारी यांचे बाबत जबाबदारी निश्चिती करीता मा. अपर कामगार आयुक्त यांना परिवहन विभागाचे पत्र क्र. परिवहन / ९१९ / २०१७, दि. ३१/०३/२०१७ अन्वये प्रथमदर्शी अहवाल सादर करण्यात आलेला आहे. या संदर्भात मा. अपर कामगार आयुक्त कार्यालयाची दि. २४/०४/२०१७ रोजी या विषयी आयोजित केलेल्या बैठकीत पाठपुरावा करून जबाबदारी निश्चितीची कार्यवाही करण्यात येईल.</td></tr>
<tr><td>०३</td><td>झालेल्या आर्थिक नुकसानाची भरपाई केव्हापर्यंत करणार आहेत ?</td><td>झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत 'ना काम ना दाम' (No work No wages) या तत्वास अनुसरून नुकसानीची भरपाई करण्यात येईल.</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

हस्ता/– निगम आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

महानगरपालिका सर्वसाधारण सभा

दिनांक 20/04/2017

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( सचिवालय )

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 44 अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमुद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रश्न क्रमांक</th><th>मा. सदस्यांचे नांव</th><th>प्रश्नाचे उत्तर</th></tr>
<tr><td>6.</td><td>6.</td><td>श्री. मनोज दशरथ सांगोळे</td><td>
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>प्रश्न</th><th>उत्तर</th></tr>
<tr><td>1</td><td>उप्पलवाडी इंडस्ट्रीयल एरियातील सांड पाणी वाहुन नेण्याची व्यवस्था केव्हा सुरु करण्यात येणार आहे.</td><td>उप्पलवाडी औद्योगिक वसाहती मधील कारखान्यातून निघणा–या सांडपाण्यावर प्रक्रीया केल्यानंतर तसे सांडपाणी वाहुन नेण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्याकरिता आवश्यक त्या क्षमतेचे सांडपाणी प्रक्रीया सयंत्र (ETP) तयार करणे व सांडपाणी वाहुन नेणे, तसेच पावसाळी पाणी वाहुन नेणे, इत्यादी करीता निधीच्या उपलब्धतेनुसार प्रारंभिक सर्व्हेक्षणाचे व प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम हाती घेता येईल.</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

हस्ता/– निगम आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

महानगरपालिका सर्वसाधारण सभा

दिनांक 20/04/2017

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( सचिवालय )

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 44 अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमुद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | मा. सदस्यांचे नांव | प्रश्नाचे उत्तर |
|---|---|---|---|
| 7. | 7. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | |

| अ.क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ०१ | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणा अंतर्गत बनविण्यात आलेल्या इमारती कळमना– नागपूर या दुहेरी रेल्वे मार्गावरील बाधीत झापडपट्टी धारकांचे पुनर्वसन करण्यात आले ,परंतु रस्त्यांची सुविधा, प्रकाश व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, गडर लाईनची व्यवस्था, रस्त्यावरील दिवाबत्तीची व्यवस्था व शहर बस वाहतुकीची व्यवस्था इत्यादी मुलभुत सुविधेपासून वंचित का ठेवण्यात आले. | कळमना–नागपूर दुहेरी रेल्वे मार्गाचे काम भिमरत्न नगर झोपडपट्टी पासून जात होते, येथील नागरीकांनी रेल्वे लाईन जवळ अतिक्रमण करून आपले वास्तव्य बऱ्याच वर्षापासून करत होते. परंतु केंद्र शासनाच्या रेल्वे दुहेरी मार्गाच्या धोरणामुळे या झोपडपट्टीतील काही नागरीकांची घरे तोडण्याकरीता रेल्वे विभागाने नोटीस दिलेल्या होत्या. येथील अतिक्रमण तोडले असता बाधित होणारे नागरीक बेघर होऊ नये, या दृष्टीकोणातून मा. विभागीय आयुक्त तसेच मा. केंद्रीय मंत्री यांच्या निर्देशानुसार या नागरीकांना नारी येथे घरकुल देण्याचे ठरविले. नारी येथे 3 इमारीतचे बांधकाम सुरू असून 1 इमारत पुर्ण झाली असल्योच सांगुन इलेक्ट्री कनेक्शन करीता लाभार्थ्यांना स्वतः अर्ज करायचा आहे. असे स्पष्टपणे या विभागाने नागरीकांना घरकुल वाटप करतेवेळी कळविले होते.<br>त्याचप्रमाणे नारी साईटवर येण्याजाण्याचा रस्ता खाजगी विकासकाच्या हद्दी असल्यामुळे जेव्हा याबाबतचा प्रश्न सोडविला जाईल. त्यानंतरच रस्त्याचे काम पुर्ण होईल असे सुध्दा स्पष्ट केले होते. या दरम्यान बाधित होणारे सर्व नागरीक उपरोक्त अटींवर सहमती दर्शविल्यामुळे या नागरीकांना येथील घरकुले वाटप करण्यात आली होती.<br>१) रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण :– कामगार चौक ते पिली नदी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण झाले असून त्या पुढील नारी–चुंगी नाका पर्यंत डांबरीकरण करण्याचे आदेश मा. आयुक्तांनी संबंधित विभागाला दिलेले आहेत. या रस्त्यापासून साईटचे अंतर अंदाजे १००–२०० मीटर असून या जागेवर खाजगी विकासकांनी प्लॉट पाडून इतर नागरीकांना विकलेले आहेत. या लेआऊट मधील रस्त्याची संरेखा स्पष्ट नाही.<br>तसेच या वसाहतीस जोडणारा रस्ता नासुप्रच्या विकास आराखडयातील असून खाजगी विकासकाच्या लेआऊट मधून जात आहे. हा रस्ता तात्काळ बांधणेत यावा याबाबत नासुप्र कडे पाठपुरावा सुरू आहे.<br>२) पाणी पुरवठा :– या विकाणी एकूण ३ इमारती असून प्रत्येक इमारती करीता १ बोरवेल प्रस्तावित आहे. त्यापैकी पहिल्या इमारतीकरीता बोरवेल बांधली असून इलेक्ट्रीक कनेक्शन उपलब्ध नसल्याने येथील पाणी वरील टॅक पर्यंत पोहचत नाही. करीता येथे म.न.पा. द्वारे मा. नगरसेवकांच्या सहाय्याने टॅकर द्वारे पाणी पुरवठा करण्यात येते. उर्वरीत २ इमारती करीता बोरवेल चे काम पुर्ण करणेचे तसेच ओसीडब्ल्यु द्वारे पाण्याचे कनेक्शन लवकरात लवकर मिळण्याचे दृष्टीने प्रयत्न सुरू आहे.<br>३) रस्त्यावर इलेक्ट्रीक पोलसहींत प्रकाश व्यवस्था :– रस्त्यावरील इलेक्ट्रीक संबंधित कामे कंत्राटदारा कडून सुरू केले असून येत्या १५ दिवसात ही कामे पुर्ण होण्याचा अंदाज आहे. ट्रान्सफार्मर चार्ज झाल्यावर येथील पथदिवे सुरू करण्यात येतील.<br>४) घरगुती विद्युत मिटर :– येथील सर्व नागरीकांना SNDL कडे अर्ज सादर करायचे होते. त्यापैकी बऱ्याच नागरीकांनी अर्ज केले असून SNDL द्वारे अद्याप मिटर लावण्यात आले नाही. करीता पर्यायी नागरीकांनी विज अनिधिकृत वापरणे सुरू केले असता, याचा भुर्दंड कंत्राटदाराने भरलेला आहे. ट्रान्सफार्मरचे काम पुर्ण झाल्यावर घरगुती मिटर मिळणे सोईचे होईल.<br>५) सिव्हर चे पाणी वाहून नेणाऱ्या मलवाहिण्या :– येथे सिव्हर लाईन उपलब्ध नसल्याने सेप्टीक टॅक चे बांधकाम करण्यात आले आहे. उर्वरीत २ इमारतीकरीता नविन सेप्टीक टॅक चे बांधकाम करण्यात येईल.<br>६) पार्किंग ची व्यवस्था :– झोपडपट्टी पुनर्वसन च्या नियममावली नुसार या योजने अंतर्गत पार्किंग मधील शिथीलतेने नुसार नकाशा मंजूर करण्यात आला आहे. मंजूर नकाशा या पत्रासोबत जोडण्यात येत आहे.<br>या विभागाशी संबंधीत असणाऱ्या बाबींचे निवारण येत्या २ महिन्यात इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यावर करण्यात येईल. तरी आपल्या माहितीकरीता सादर. |

हस्ता/– निगम आयुक्त
महानगरपालिका, नागपूर